# ब्रिटिश निवडणुका

**चंद्रशेखर पुरंदरे**

सात मे रोजी ब्रिटनमध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. ब्रिटनच्या संसदेत ६५० खासदार असतात. निवडणुका लढवलेल्या अनेक पक्षांपैकी पाच पक्ष महत्त्वाचे. सत्ताधारी हुजूर पक्ष, त्यांच्याबरोबर युती असणारा लिबरल डेमोक्रॅट पक्ष, मजूर हा विरोधी पक्ष, स्कॉटिश नॅशनल पार्टी (SNP) व UK Independence Party (UKIP). निवडणुकीत हुजूर पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने त्यांचे स्वत:चे सरकार सत्तेवर आले. लिबरल डेमोक्रॅटस्, मजूर पक्षांची मोठी पिछेहाट झाली तर स्कॉटिश नॅशनल पार्टीचे बळ आधीच्या सहा जागांवरून ५६ जागांवर गेले. UKIP ला एक जागा मिळाल्याने तो पक्ष संसदेत नामशेषच झाला.

**निवडणुकीतील प्रमुख मुद्दे**

पहिला मुद्दा म्हणजे जागतिकीकरणाच्या रेट्याखाली कल्याणकारी राज्याचा संकोच चालू ठेवायचा की नाही. दुसरा मुद्दा म्हणजे प्रादेशिक स्वायत्तता देशाच्या विभाजनाच्या टोकापर्यंत ताणायची का नाही. त्यात अनुस्यूत मुद्दा सामूहिक अस्मितेचा. तिसरा मुद्दा ब्रिटनच्या युरोपियन युनियनच्या सदस्यत्वाचा. या मुद्द्यांबाबत प्रमुख पक्षांची भूमिका प्रथम पाहू. मग निकालांचे संकेत.

सत्ताधारी हुजूर पक्षाची पायाभूत मूल्ये म्हणजे मुक्त बाजार, राष्ट्र-राज्याचा त्याच्या व्यवहारात कमीत कमी हस्तक्षेप जेणेकरून व्यक्तिस्वातंत्र्याचा (उद्योजकतेच्या दृष्टीने) विकास होईल व उद्योगांना मोकळिक मिळेल असा खुला कौशल्याधारित उतरंड असणारा समाज अस्तित्वात यावा. युरोपियन युनियनच्या सदस्यत्वाचा प्रश्न सार्वमताने सोडवावा.

विरोधी मजूर पक्षाच्या मते न्याय्य समाजासाठी श्रीमंतांवर अधिक कर लादावा. तो पैसा सामाजिक कार्यक्रमांकडे वळवावा. (शिक्षण, आरोग्यसेवा, परवडणारी घरे, इत्यादी), उद्योग-व्यापारावर राष्ट्र-राज्याची कडक देखरेख असावी व या साऱ्यासाठी नागरी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शासकीय हस्तक्षेप जरूर आहे. मजूर पक्ष युरोपियन युनियनमध्ये रहायला अनुकूल आहे.

लिबरल-डेमोक्रॅटिक पक्षाची भूमिका वरील दोन पक्षांच्या मधली. विशिष्ट मुद्द्यावर कधी सरकारी हस्तक्षेप हवा, कधी नको. त्यांच्यामुळे हुजूर पक्षाच्या काही अतिउजव्या धोरणांना आळा बसला.

चौथा पक्ष SNP. त्यांची भूमिका समजण्यासाठी ब्रिटनची घडण लक्षात घ्यायला हवी. आपल्याकडे पूर्वापारच्या गैरसमजाने ब्रिटन म्हणजे इंग्लंड. वस्तुत: युनायटेड किंगडम (किंवा ब्रिटन)चे चार प्रांत आहेत. इंग्लंड हा त्यातला एक, व इतर तीन स्कॉटलंड, उत्तर आयर्लंड व वेल्स. त्यांचे परस्परसंबंध केंद्र-राज्य असेही नाहीत. तीनशे वर्षांपूर्वी इंग्लंडने स्कॉटलंड जिंकून आपल्याशी जोडला. या वसाहतवादाविरुद्ध SNP ला स्कॉटलंड हा निराळा देश हवा आहे. स्कॉटलंडने उर्वरित ब्रिटनमधून बाहेर पडावे का या प्रश्नावर गतवर्षी सार्वमत घेण्यात आले. त्यानुसार ५५% स्कॉटिश मतदारांनी विभक्त होऊ नये असे म्हटले तर ४५% विभक्तीला अनुकूल होते. हे ४५% आता अचानक वाढलेले दिसतात. हुजूर, मजूर व लिबरल डेमोक्रॅट या तिघांचाही विभक्तीला विरोध आहे. त्यामुळे त्यांचा प्रचारात सतत 'एक राष्ट्र' हा उद्घोष होता. SNP कल्याणकारी राज्याचा पुरस्कर्ता आहे. आजही स्कॉटलंडमध्ये आरोग्यसेवा, शिक्षण इंग्लंडपेक्षा स्वस्त म्हणजे मोफतच आहे. मुळात आमचा कारभार आम्ही चालवू. त्यावर लंडनचे (इंग्लंडची व ब्रिटनची राजधानी, स्कॉटलंडची राजधानी एडिंबरा) नियंत्रण नको हा मुद्दा आहे. अंतर्गत कर-आकारणी, त्या पैशाचा विनियोग स्कॉटलंड स्कॉटलंडसाठी करेल. कोणत्याही परिस्थितीत SNP हुजूर पक्षाला साथ देणार नाही हेही त्यांनी जाहीरनाम्यात स्पष्ट केले. किमान वेतनही ब्रिटनपेक्षा जास्त देण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे.

पाचवा पक्ष UKIP. हा पक्ष इंग्लिश राष्ट्रवादाचा पुरस्कार करतो. ब्रिटन युरोपियन युनियनचा सदस्य असणे त्यांना मंजूर नाही.

**निवडणुकांचे निकाल**

सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे हुजूर पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. ते त्यांनाही अनपेक्षित होते. (निवडणुकीच्या आधीच्या महागड्या व तांत्रिक सर्वेक्षणांची व अंदाजांची अविश्वासार्हता पुन्हा दिसली!) त्यांचे यश आपल्याकडच्या बीजेपीच्या केंद्रीय निवडणुकीतील यशासारखे म्हणता येईल. स्कॉटलंडमधील ५९ जागांपैकी SNP ला ५६ जागा मिळाल्या तो विजय 'आप'च्या दिल्लीच्या विजयासारखा. तर मजूर व लिबरल डेमोक्रॅटस्च्या अनुक्रमे ४९ व २६ जागा हातातून गेल्या.

निवडणुकीच्या निकालांनी ब्रिटनचा राजकीय नकाशा एकदम बदलला. आपल्याकडे जसे जम्मूमध्ये बीजेपी व काश्मीरमध्ये पीडीपी वगैरे चित्र उभे राहिले, तोच प्रकार. SNP आणि मजूर एकत्र आले तर ब्रिटनचे तुकडे पडतील ही भीती हुजूर पक्षाने प्रचारात जनमानसात रूजवली. त्याचा एक परिणाम म्हणून लोकांनी मजूर पक्षाला इंग्लंडमध्ये व विशेषत: स्कॉटलंडमध्ये नाकारले.

आणखी एक घटक म्हणजे निवडणुकांचे निकाल बहुमतावर आधारित असतात. म्हणजे, एखाद्या मतदारसंघात ज्या उमेदवाराला जास्त मते मिळतात, तो विजयी. दुसऱ्या क्रमांकाच्या हरलेल्या उमेदवाराच्या पक्षाला एकूण देशात किती मते मिळतात त्या प्रमाणात त्या पक्षाला संसदेत जागा मिळत नाहीत. (आपल्याकडच्या सारखेच). त्यामुळे एकूण देशभरच्या मतांपैकी पाच टक्केहून कमी मते मिळूनही SNP ला साडेआठ टक्के जागा मिळाल्या तर साडेबारा टक्के मिळूनही UKIP ला एकच जागा मिळाली.

**निवडणुकांवरील खर्च**

हा मुद्दा भारतीय संदर्भात महत्त्वाचा आहे. ब्रिटनमधील निवडणुका कमी खर्चिक असतात. प्रत्येक पक्ष जास्तीत जास्त किती खर्च करू शकेल याची कायदेशीर मर्यादाच कमी असते आणि ती काटेकोरपणे पाळली जाते. प्रत्येक पक्षाला निवडणुकीच्या आधीच्या संपूर्ण वर्षात सुमारे २०० कोटी रुपये खर्च मंजूर असतो. (हा संपूर्ण पक्षाचा खर्च, वैयक्तिक उमेदवाराचा नव्हे.) २०१० च्या निवडणुकीत हुजूर पक्षाने त्यातील १६७ कोटी खर्च केले. तर यावर्षी UKIP ला १० कोटी रुपये देणगी मिळाल्यावर त्यांना खर्च काय करायचा हा प्रश्न होता! (अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीत ओबामा व प्रतिस्पर्धी मिट रॉमनी यांनी प्रत्येकी ७००-८०० कोटी खर्च केले.)

**नंतरचे काव्य**

नवीन अर्थमंत्री लवकरच सामाजिक खर्चात प्रचंड कपात जाहीर करेल असे अपेक्षित आहे. हुजूर पक्षाच्याच नगरपालिकांकडून त्याविरुद्ध आवाज उमटण्यास सुरूवात झाली आहे. नागरी सुविधा कमी कराव्या लागू नयेत हा विचार या विरोधामागे आहे. नवीन नेता जर कामगार-संघटनांना अनुकूल नसेल, तर त्या संघटना मजूर पक्ष सोडतील अशी धमकी त्यांच्या नेतृत्वाने दिली आहे. SNP च्या विजयामुळे स्कॉटलंडमध्ये पुन्हा एक सार्वमत एक-दोन वर्षांत घेतले जाण्याची शक्यता आहे.

युरोपियन युनियनमध्ये ब्रिटनने रहायचे की नाही या मुद्द्यावर २०१७ मध्ये देशात सार्वमत घेण्याचे आश्वासन निवडणुकीआधी हुजूर पक्षाने दिले होते. ते सार्वमत कदाचित त्या आधी घेतले जाईल कारण नवीन पेच निर्माण होत आहेत. नवीन सरकार या प्रश्नाला कसे सामोरे जाते ते लवकरच कळेल.

स्कॉटलंडच्या स्वातंत्र्याचा प्रश्नही या निर्णयाशी निगडित आहे. ब्रिटन या युनियनमधून बाहेर पडलाच तर स्कॉटलंडही ब्रिटनमधून बाहेर पडून युनियनमध्ये स्वतंत्र देश म्हणून दाखल व्हायला अधिक उत्सुक होईल.

**निरीक्षणे**

इंग्लंड हा हुजूर पक्षाचा देश व स्कॉटलंड त्यांना विरोध करणाऱ्या SNP चा देश हे चित्र स्पष्टपणे निर्माण झाले आहे. या भौगोलिक-राजकीय परिस्थितीने पुढच्या दहा-वीस वर्षांत स्कॉटलंड हे नवीन राष्ट्र जन्माला येणे शक्य आहे. तसेच बहुमताचे सरकार म्हणजे स्थिर सरकार हे गृहीत संशयास्पद आहे.

## जगभरात अन्यत्र –

### दक्षिण पूर्व आशिया

म्यानमार (ब्रह्मदेश) या बहुसंख्य बौद्धधर्मीय देशात मुस्लिम अल्पसंख्याकांचा पद्धतशीर छळ - सामाजिक बहिष्कार, आर्थिक बहिष्कार अनेक वर्षे चालू आहे. या छळाने आता हिंसक रूप धारण केल्याने शेकडोने रोहिंग्या जमातीचे मुस्लिम देश सोडून जात आहेत. तसेच बांगलादेशातून अतिगरीब लोक. अशा हजारो निर्वासितांच्या बोटी आता ब्रह्मदेश, बांगलादेशातून थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया या देशांच्या सागर हद्दीत जात आहेत. काही बोटी प्रवासातच उलटल्याने अनेक लोकांना मृत्युमुखी पडावे लागले. प्रवासापुरताही अन्नपुरवठा नसल्याने उपासमार, अन्नासाठी दंगे होतात. प्रसंगी सहप्रवाशांना समुद्रात फेकण्यात येते. आजमितीला असे ८००० लोक गेले काही महिने समुद्रावर आहेत.

थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया यांनी आता वर्षभराचा तात्पुरता आसरा देण्याचा निर्णय घेतला आहे. म्यानमार व बांगलादेश यांची उदासीनता लक्षणीय आहे.

### बुरुंडी

मध्य आफ्रिकेतील बुरुंडी देशात एप्रिलपासून अशांतता आहे. घटनेप्रमाणे अध्यक्षाला दोन मुदती असतात व तिसऱ्यांदा निवडणूक लढवता येत नाही. विद्यमान अध्यक्षाच्या दोन मुदती झाल्या आहेत, तरी तिसऱ्यांदा त्याला अध्यक्ष व्हायचे आहे. याविरुद्ध देशभर एप्रिलपासून दंगली, जाळपोळी व निदर्शने चालू आहेत.

मेच्या पूर्वार्धात लष्कराने सत्ता ताब्यात घेतल्याचे जाहीर केले. मात्र, २४ तासात व ३० लोकांच्या हत्येनंतर हा उठाव मिटला. पण उसळलेल्या हिंसेने सुमारे १ लाख निर्वासित शेजारच्या देशात - प्रामुख्याने काँगोत गेले आहेत.

### इजिप्त

इजिप्तचे पहिले निर्वाचित अध्यक्ष महम्मद मोरसी विविध रचलेल्या आरोपांखाली अटकेत आहेत. त्यांना मे महिन्याच्या मध्यावर फाशीची शिक्षा जाहीर करण्यात आली. ती बहुधा अंमलात येणार नाही. पण राजकीय विद्वेष काय थराला जातो हे यातून दिसून आले.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*